# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २५६/२००८/ दिनांक :

१) श्री. सोमनाथ ज. तलवाड, अर्जदार
हॉटेल टुरिस्ट, जामगांव (आ),
ता. बार्शी, जि. सोलापूर

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा
नोडल ऑफीसर, म.रा.वि.वितरण कं.लि.,
संवसु मंडल कार्यालय, ऊर्जा नगर,
मुरारजी पेठ, सोलापूर– ००१

२) कार्यकारी अभियंता,
म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित. विरूध्द पक्षकार
संवसु विभागीय कार्यालय, बार्शी

३) सहाय्यक अभियंता,

म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
ग्रामीण उप विभागीय कार्यालय,
बार्शी

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ६.५ चे तरतुदीनुसार



## <u>न्यायनिर्णय</u>

<u>श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,ग्रा.त.नि.मंच यांचेतर्फे</u> दिनांक १६.१२.२००८

प्रस्तुत अर्ज हा अर्जदाराने, त्यांचे ग्राहक क्र. ३३३८४०४४८९०३ मौंजे जामगांव (आ), ता. बार्शी, जि. सोलापूर या संबंधात दिलेला आहे. संबंधित विद्युत पुरवठा हा हॉटेल व्यवसायासाठी दिलेला आहे. अर्जदाराचे म्हणणे की, सन १९९८ साली फिरते पथकाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या हॉटेलमध्ये भेट दिली व त्यांना वापरलेल्या अनधिकृत विजेचे बील देण्यात आले, असे बील रु. ३४८९९/– असे होते. पुढे त्या बिला बाबत ग्राहकाने वि.प.च्या कार्यकारी अभियंता, सोलापूर यांच्याकडे त्या बिलाबाबत तक्रार केली. परंतु सन १९९८ पासून पुढे अद्यापपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांनी त्या बिला संदर्भात कोणताही निर्णय न घेतल्याने त्याची विनाकारण थकबाकी दाखविली जात आहे. सबब या मंचाकडून तक्रार निवारण होणेबाबत अर्ज दाखल केला. सदरचा अर्ज दि. १०.८.२००७ अशा तारखेचा आहे. मात्र तो अर्ज या कार्यालयास दि. ३१.१०.२००८ रोजी प्राप्त झाला आहे. सकृतदर्शनी अर्जासोबतची कागदपत्रें पहाता, अर्जदाराची तक्रार ही अनधिकृतपणे विजेचा वापर विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ अंतर्गत असल्याची दिसून आली. तरी न्यायाच्या दृष्टीने वि.प.चे म्हणणे ऐकून उचित निर्णय घेण्यासाठी या मंचाने सदरचा अर्ज तक्रार सदरात नोंदवून घेतला व वि.प.चे म्हणणे दाखल करुन सुनावणीसाठी नोटीस दिली.

वि.प.चे म्हणणे की, अर्जदाराचे हॉटेल टुरिस्ट, मौंजे जामगांव (आ), ता. बार्शी येथे असून त्या हॉटेलची सन १९९८ मध्ये फिरते पथकाने तपासणी केली असता तेथे अनधिकृत विजेचा वापर करण्यात आला असून त्याचे पुरवणी देयक रु.२४५०२/– असे देण्यात आले. ते देयक त्यांनी भरले नाही. वि.प.ने केलेल्या कारवाईच्यावेळी ग्राहक हजर होते व ग्राहकाचे संमत्तीपत्र दाखल करण्यात आले आहे व ते संमत्तीपत्र या म्हणण्यासोबत दाखल करण्यात आलेले आहे. तसेच दि. १२.८.१९९८ चा अर्जदाराच्या हॉटेलचे मॅनेजर श्री. शेख यांचाही जबाब घेण्यात आला होता व तो जबाबही म्हणण्यासोबत दाखल केलेला आहे. त्या जबाबावर मालकानेही सही केलेली आहे. पुढे वि.प.ने दिलेल्या बिलाबाबत वसुली संदर्भातील कारवाईमध्ये सन २००३ मध्ये व्याजासह होणारी रक्कम रु. ३५०००/– भरण्याची तयारी अर्जदाराने दर्शविली होती. परंतु पुढे अर्जदाराने रक्कम भरली नाही. सबब त्याचे बील थकीत झाले व नियमाप्रमाणे व्याज व दंड आकारणी वाढत

गेली. वि.प.चे म्हणणे की, विद्युत कायदा २००३ चे कलम १२६ अंतर्गत सदर प्रकरण या मंचाचे अधिकारक्षेत्रात येत नाही सबब ते फेटाळण्यात यावे.

या प्रकरणी सुनावणीकामी सोलापूर मंडल येथे दि. ११.१२.२००८ रोजी दोन्ही पक्षकारांना बोलविण्यात आले. त्यावेळी अर्जदार स्वत: हजर राहिले. तसेच वि.प.तर्फे श्री. पठाण व निकम हे अधिकारी हजर झाले. सुनावणीचेवेळी दोन्ही पक्षकारांमार्फत आपले म्हणणे मंचासमोर मांडण्यात आले. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे व सुनावणीवेळी सादर केलेली कागदपत्रे याचा विचार करता, खालील मुद्दे आमच्या निष्कर्षास उदभवतात.

१) प्रस्तुत प्रकरण मुदतीमध्ये आहे काय ?

उत्तर : नाही

२) प्रस्तुत प्रकरण या ग्राहक मंचाचे अधिकारक्षेत्रात येते काय ?

उत्तर : नाही ( म.रा.वीज नियामक आयोग अधिनियम २००६ चे कलम ६:८ प्रमाणे)

३) आदेश ?

उत्तर : अखेरच्या आदेशा प्रमाणे



<u>कारणमिमांसा</u>

सकृतदर्शनी अर्जदाराचे तक्रार संबंधित बील बाकी १९९८ मध्ये वि.प.ने कारवाई केली होती त्याप्रमाणे होय. सबब म.रा.वीज नियामक आयोग अधिनियम २००६ चे कलम ६:६ प्रमाणे सदरचे प्रकरण २ वर्षापेक्षा जास्त काळाचे असलेने या मंचास त्या बाबत विचार करता येत नाही. परिणामी अशी तक्रार मुदतबाह्य झालेली आहे.

अर्जदाराच्या अर्जातील म्हणण्याप्रमाणे त्यांना दिलेले बील हे सन १९९८ मध्ये फिरत्या पथकाने केलेल्या कारवाई बाबत आहे. तसेच त्या संबंधात हॉटेलचे व्यवस्थापक यांचा जबाबही घेण्यात आलेला होता व त्यावर अर्जदाराने सही केलेली आहे. सुरुवातीस कारवाईवेळी दिलेले पुरवणी देयक रु. २४५०२/– असे देण्यात आले होते व हे बील विजेचा अनधिकृत वापर केल्याबाबत आहे. वि.प.ने संबंधितवेळी केस क्र. ७५९(अे)/ओई दिनांक १०.८.१९९८ अशी नोंद केली होती त्याचाही उल्लेख अर्जदाराचे अ फॉममध्ये दिसून येत आहे. सबब म.रा.वीज नियामक आयोग अधिनियम २००६ चे कलम ६:८ मधील तरतुदी प्रमाणे सदरचे प्रकरण विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ अंतर्गत येत असलेने या मंचाला त्याबाबत निर्णय घेण्यास व आदेश देण्याचा अधिकार पोचत नाही.

वरील कारणमिमांसे प्रमाणे अर्जातील मुद्दा क्र. १ व २ कडे आमचे निष्कर्ष / उत्तर नोंदवित आहोत.

वरील प्रमाणे निष्कर्ष व कारणमिमांसा याचा विचार करता, प्रस्तुत अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. तसेच हा अर्ज विनाकारणच केला असल्याने त्याबाबत अर्जदारावर खर्च बसविणे आवश्यक ठरते. परंतु सदरचा मंच हा ग्राहकावरील अन्याय निवारण्यासाठी असल्याने अर्जदारावर खर्च बसविणे आम्हास न्याय वाटत नाही. सबब खालील प्रमाणे आदेश.

## आदेश

१) अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३)	या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

( काकासाहेब य . जगताप )
अध्यक्ष,
दिनांक : १६.१२.२००८	ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर

श्री. जी.सी लेले, ग्राहक सदस्य ..

श्री. एस.आर. बांबळे, सदस्य सचिव ..